दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)

24 तास सेवा ।। श्री नागनाथ कृपा ।। प्रो.प्रा.यमपुरे अशोक 8014842121
सूर्योदय मेडिकल & जनरल स्टोअर्स
CHEMIST & DRUGIST
शुगर,बीपी,थायरॉड,अस्थमा तसेच मुंबई,पुणे,औरंगाबाद, लातुर,बार्शी,सोलापुर,नगर येथील मेडिसिन मिळेल
सर्व प्रकारचे मेडिसिन घरपोच मिळतील
मन्मथस्वामी चौक,पाटोदा रोड,मांजरसुंबा ता.जि.बीड

कोकण || वर्ष २ रे || अंक २१० || रविवार, १४ जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## भावेश पटेल ,सौ.केतना पटेल यांनी मिळविले सीए परीक्षेत उत्तम यश पटेल कुटुंबियांवर अभिनंदनाचा वर्षाव

चिपळूण (ओंकार रेळेकर) चिपळूण शहरातील नामवंत बांधकाम व्यवसायिक प्रवीण पटेल यांचे चिरंजीव भावेश पटेल व शहरातील गजानन स्वा मिलचे मालक पुरुषोत्तम पटेल यांची कन्या सौ.केतना कुणाल पटेल यांनी कोल्हापूर येथे झालेल्या सीए परीक्षेत उत्तम यश मिळविले आहे.ङ्मया यशाबद्दल भावेश पटेल,केतना पटेल यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत असून चिपळूण तालुक्यात पटेल कुटुंबीयांनमध्ये चार्टर्ड अकाउंटंन होण्याचा बहुमान भावेश व केतना यांनी मिळविला आहे. चिपळूण शहरातील नामवंत बांधकाम व्यवसायिक कविता डेव्हलपर्सचे मालक श्री.प्रवीण पटेल यांचा भावेश चिरंजीव असून कावीळतळी येथील गजानन स्वॉमिलचे मालक पुरुषोत्तम पटेल यांची सौ.केतना कुणाल पटेल ही सुन आहे. सौ.केतना विवाहानंतर पुणे येथे स्थायिक झाली असून ङ्मतिचे पती कुणाल पटेल हे सुद्धा पुण्यामध्ये नामवंत सीए आहेत.चिपळूण शहरातील गद्रे इंग्लिश मिडीयम स्कूल येथे भावेश याचे दहावी पर्यंत शिक्षण पूर्ण झाले तर केतना हीचे गुहागर तालुक्यातील तळी येथील एका शिक्षण संस्थेत शिक्षण झाले.या दोघांना वयाच्या २४ व्या वर्षी सीए होण्याचा बहुमान मिळाला आहे. शहरातील नामवंत सीए बापूसाहेब भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली भावेश याने सराव केला आहे. द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट ऑफ इंडिया कोल्हापूर येथे हे दोघे चार वर्ष शिक्षण घेत होते. २४ मे २०२४ रोजी झालेल्या सीए परीक्षेचा गुरुवार दि. ११ जुलै २४ रोजी निकाल लागला यात चांगली ग्रेड मिळवत या दोघांनी यश संपादन केले.





## बोरथळ - मंडणगड एसटी बस ला अपघात

मंडणगड : आज सकाळी ८ च्या सुमारास देव्हारे निगडी फाटा दरम्यान एका अवघड वळणावर समोरून येणाऱ्या इनोवा कार ला वाचविण्याच्या प्रयत्नात चालकाचे बस वरील नियंत्रण सुटून एसटी बस रस्त्या लगतच्या नाल्यात पलटली.



सकाळच्या सुमाराची बस असल्याने या बस मध्ये मंडणगड मध्ये कॉलेज येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक होती. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी काहींना किरकोळ दुखापत झाली असून सर्व जखमींना उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र देव्हारे येथे स्थानिकांच्या मदतीने नेण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच मंडणगड तालुका शिवसेना तालुकाप्रमुख श्री. संतोषदादा गोवळे, उप तालुका प्रमुख रघुनाथ पोस्टुरे, युवासेना उपजिल्हाधिकारी गणेश बिल्लार, अतिश तांबे, उमेश घागरूम, गणेश सावर्डेकर आदी लोकांनी घटना स्थळी जाऊन मदत कार्यात हातभार लावला. यावळे घटना स्थळी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. आळे, पोलीस हवालदार शेख ७८६ , पोलीस चालक शिंदे ४५९ तसेच एसटी महामंडळाचे कर्मचारी हजार होते.

## रायगडात पावसाचे थैमान, सिव्हिल हॉस्पिटल च्या सर्जिकल वार्ड मध्ये पाणीच पाणी : अलिबागचे मुख्य रस्ते बुडाले पाण्यात

रायगडात पावसाचे थैमान, जनजीवन विस्कळीत आनंद घ्या; पण जपूनजिल्ह्यातील धोकादायक ठिकाणी पोलीसबंदोबस्त तैणात; पर्यटनाचा आनंद घेताना सावधानता बाळगण्याचे प्रशासनाचे आवाहन

रायगड

(धम्मशील सावंत )

रायगड जिल्ह्यात पावसाचे थैमान सुरू असून सकाळपासून सर्वत्रच धुवांधार पाऊस कोसळत आहे. पावसाचा जोर वाढल्याने अलिबाग येथील जिल्हा सरकारी रुग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावरील सर्जिकल वार्ड मध्ये पाणीच पाणी साचले होते.त्यामुळे रुग्णांसह त्यांचे नातेवाईक आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची तारांबळ उडाली. अशीच परिस्थिती अलिबागच्या मुख्य रस्त्यावर दिसून आली, येथील अनेक रस्ते पाण्यात बुडाल्याने वाहनचालकांची तारांबळ उडाली आहे. रायगड जिल्ह्यातील धबधबे, धरणे, नद्या ओसंडून वाहू लागल्या आहेत. त्यामुळे नकळत निसर्गप्रेमींची पाऊले या स्थळांकडे वळू लागली अहेत. सह्याद्रीच्या दऱ्या खोऱ्यातील ही पर्यटनस्थळे जितकी आकर्षक आणि मनाला आनंद मिळवून देतात, तितकीच ती धोकादायकही आहेत. कुठे जाऊ नये याची कल्पना नवख्या पर्यटकांना अजिबात नसते. समोर दिसणारे पाण्याने भरलेले ढग, त्या ढगांना स्पर्श करण्याची चढाओढ करणाऱ्या हिरव्यागार पर्वतरांगा आणी या यातूनच कोसळणाऱ्या धबधबांमधून उसळणारे पाण्याचे तुषार अंगावर घेताना आपण मृत्यूच्या सापळ्यात कधी अडकतात हे कळतच नाही.



मान्सून सुरु झाल्यापासून रायगड जिल्ह्यात बुडुन मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींची संख्या १५ इतकी झाली आहे. ही जेमतेम दीड महिन्यातील मृतांची संख्या आहे. त्यामुळे जीवितहानी टाळण्याचे मोठे आवाहन आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणासमोर उभे आहे. तीन दिवस पडलेल्या मुसळधार पावसाने नदीनाले तुडुंब भरलेले असल्याने दुर्घटना टाळण्यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षकांनी अशा धोकादायक पर्यटनस्थळांवर पोलीस बंदोबस्त तैणात केला आहे. परंतु काही अतिउत्साही, हुल्लडबाज पर्यटक चोर वाटेने जावून आपला जीव धोक्यात घालतच असतात. त्यामुळे प्रशासनाने बंदीबरोबर आनंदमय पर्यटनासाठी जनजागृती सुरु केली आहे. पावसाळी पर्यटनातून रोजगारची संधी उपलब्ध होत असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांकडूनही यात सहभाग घेतला जात असून कुठे जाऊ नका आणि कुठे गेलात तर कोणती खबरदारी घेणे आवश्यक आहे, याबद्दल माहिती दिली जात आहे.

## घरी मीटर नसलेल्या शेतकऱ्याला १६ हजारांचे बिल

झीरो पोल योजनेंतर्गत कनेक्शन देण्यासाठी महावितरणच्या कालीमाती येथील सहायक अभियंत्याने १५ हजार रुपये जानेवारी २०२३ मध्ये घेतले. त्यानंतर प्रतिज्ञापत्र ऑनलाइन करण्यास सांगितले.महावितरण, महसूलची नाहरकत हे सर्वच करण्यास सांगितले. मात्र अद्यापही ना खांब लागले, ना मीटर लागले नसतानाही शेतकऱ्याला १६ हजार ३९० रुपयांचे बिल पाठविण्यात आले. आता तो सहायक अभियंता ती योजना बंद झाल्याचे सांगून आपले हात झटकत आहे. परिणामी तो शेतकरी संकटात आला आहे.आमगाव तालुक्यातील कातुर्ली येथील प्रेमलाल अनंतराम बिसेन यांची शेती कातुर्ली गावात आहे. त्यांना महावितरणच्या एका कर्मचाऱ्याने २०२३ मध्ये महाराष्ट्र कृषी धोरणाअंतर्गत झीरो पोल योजनेंतर्गत शेतात ट्रान्सफॉर्मर लावून मिळतो. त्यासाठी महावितरणच्या कार्यालयात संपर्क करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार प्रेमलाल बिसेन यांनी कालीमाती येथील महावितरणच्या उपकेंद्रात जाऊन सहायक अभियंता अनंत प्रसादकर यांची भेट घेतली. प्रसादकर यांनी त्यांना यासाठी १५ हजार रुपये लागतील असे सांगितले. शेतकरी बिसेन यांनी १५ हजार रुपये सहायक अभियंत्याला जानेवारी २०२३ मध्ये दिले. त्यानंतर झीरो डीपी अंतर्गत कनेक्शन मिळेल अशी हमी दिली. त्यासाठी प्रतिज्ञापत्र करून महावितरण आणि महसूल विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले.शेतकऱ्याने तसेच केले. सर्व प्रक्रिया महावितरणच्या पोर्टलवर ऑनलाइन केली. परंतु, ट्रान्सफॉर्मर, खांब आणि मीटरदेखील लागले नाही. परिणामी प्रेमलाल बिसेन यांनी पुन्हा कालीमाती कार्यालयात प्रसादकर यांची भेट घेतली. आता मात्र सहायक अभियंत्याने ती योजना बंद झाली असे सांगितले. असे असताना मात्र त्या शेतकऱ्याला महावितरणने १६ हजार ३९० रुपयांचे बिल धाडले.

## विद्यार्थ्यांची दप्तराविना शाळा भरणार, केंद्र सरकार शिक्षण धोरणात मोठा बदल करणार.

मुंबई

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद प्रधान यांच्या नेतृत्वाखाली आज दिल्लीत राष्ट्रीय शिक्षण निती अंतर्गत बैठक घेण्यात आली होती. यामध्ये पुढील पाच वर्षांसाठी शैक्षणिक स्तरावरील विविध गोष्टींवर चर्चा करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री धर्मेंद प्रधान म्हणाले राज्य आणि केंद्र सरकारची शिक्षण पद्धती एकसारखी असली पाहिजे ज्यामुळे राज्यांना सुद्धा एका टीम प्रमाणे काम करता येवून देशातील शैक्षणिक स्तर उंचावता येईल. पीएम मोदी यांच्या विकसित भारतच्या संकल्पात शिक्षण मुलभूत पाया आहे. आता शैक्षणिक विकाससाठी सर्वांनी एकत्र काम केले पाहिजे. राष्ट्रीय शिक्षा नितीवर देशातील शैक्षणिक प्रगती उंचावली आहे.

भारत हा तरुणाचा देश आहे आपल्यासमोर २१ वे शतक सुरु आहे त्यामुळे आपण शिक्षणातून एक चांगला नागरिक घडवणे आपली सामाजिक जबाबदारी आहे. जगात गोष्टी तंत्रज्ञानामुळे झपाट्याने बदलत आहेत. आधुनिक अशी शिक्षण व्यवस्था बनवली पाहिजे, तंत्रज्ञानावर



भर दिला पाहिजे, रोजगार क्षमता वाढवण्यासाठी कौशल्यावर भर दिला पाहिजे असे मत धर्मेंद प्रधान यांनी मांडले. पुढे राज्यमंत्री जयंत चौधरी म्हणाले २०२० ची शिक्षण धोरण पॉलिसी प्रगतीच्या दिशेने नेणारी आहे.दप्तराचे ओझे होणार कमी

शिक्षा मंत्रालयाने दप्तराविना शाळा या संकल्पनेची गाइडलाइन तयारी केली आहे. यामध्ये सीबीएसई, एनसीइआरटी, केंद्रीय विद्यालय आणि नवोदय विद्यालयाच्या संघटनेबाबत चर्चा झाली आहे. लवकरच संकल्पना देशात लागू केली जाण्याची शक्यता आहे. यामध्ये वार्षिक शैक्षणिक वर्षातील दहा दिवस विना दप्तराचे असतील, त्या दिवशी विद्यार्थ्यांना शाळेच्या भितींबाहेरील जगात फिल्ड विजीट साठी नेले जाईल. यामध्ये स्वच्छ पाणी कसे ओळखायचे त्याचे परीक्षण शिकवले जाईल किंवा स्थानिक वनस्पतींची आणि पक्षु प्राण्यांची ओळख करुन दिली जाईल. स्थानिक स्मारकांना भेट देण्यात येईल

.सहावी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक शैक्षणिक वर्षात दहा दिवसांची विना दप्तर योजना गरजेची असणार आहे. याकाळात विद्यार्थी स्थानिक कलेतील तज्ज्ञांसोबत इंटरनशिप करु शकतात. याशिवाय दप्तरविना शाळा भरेल त्या दिवशी कोडी सोडवा, खेळ, कोशल्य आधारित शिक्षण घेवू शकतील. तसेच गड किल्ल्यांना भेट देवू शकतात इतिहासाची ओळख करु शकतात. स्थानिक कलाकार किंवा आर्टिस्ट यांना भेटू शकतात. वर्गाबाहेरील कौशल्य विद्यार्थ्यांना शिकवणे हेच दप्तरविना शाळा योजनेचे उद्दिष्टे आहे.

शिक्षा आणि साक्षरता विभागाचे सचिव संजय कुमार म्हणाले तंत्रज्ञानाने सुसज्ज वर्ग असणे काळाजी गरज आहे. शाळा परिसर तंबाखू मुक्त असला पाहिजे. शाळेत पीएम श्री, पीएम पोषण, पीएम उल्लास सारख्या योजना राबवल्या पाहिजेत.

